**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक ३० ऑगस्ट, १९९९**

## परिपत्रक

क्रमांक- एसईसी/जीईएन-१९९९/प्र.क्र.६५/कार्या.१०--- भारतीय संविधानाच्या ७३ व ७४व्या दुरुस्तीनुसार पंचायत व नगरपालिकांच्या निवडणुका पार पाडण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३के व २४३झेडए मधील तरतुदीनुसार पंचायती व नगरपालिका निवडणुकांच्या संदर्भात मतदार याद्या तयार करणे तसेच निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याबाबतचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेले आहेत. पंचायती व नगरपालिका यांच्या निवडणुका पार पाडण्याच्या संदर्भात संबंधित कायदयातील तरतुदीनुसार राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेले अधिकार जिल्हाधिकारी अथवा महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यापैकी जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा व नगरपंचायती या संदर्भातील अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना तर महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या संदर्भातील अधिकार महानगरपालिका आयुक्तांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

२ राज्यातील प्रशासकीय व्यवस्थेनुसार महसूली विभागातील सर्वोच्च प्रशासकीय अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त यांचेकडून काम पाहिले जाते. त्या अनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या कामाचा समन्वय विभागीय आयुक्त यांच्या

कृ.मा.प.

ए-५९६ (४००-८-०१) २९

364

स्तरावरून होत असेलच. विभागीय आयुक्त यांना विभागीय निवडणूक अधिका म्हणून पदसिध्द पदनाम दिल्यास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका विभागीय आयुक्तांचे अधिक प्रभावी नियंत्रण तर राहीलच तसेच निवडणुका मु निर्भय व शांत वातावरणात पार पाडणे अधिक सुलभ होईल असे आयोगाचे मत आ

३. भारतीय संविधान तसेच पंचायती व नगरपालिका निवडणुकांच्या संदर्भात सध्याचे अधिनियम याद्वारे राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेले अधिका जिल्हाधिकारी अथवा महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान करण्यात आलेले आहे त्यानुसार संबधित अधिकारी पंचायती व नगरपालिका निवडणुकांचे कामकाज पाडत आहेत. सदर अधिका-यांनाही निवडणुकांमध्ये ज्या जबाबदा-या पार पाडाव्या लागतात त्यानुसार त्यांना द्यावयाची पदसिध्द पदनामे (Ex-officio Designations) सोबत जोडलेल्या तक्त्यात नमूद करण्यात आलेली आहेत.

४. सदर पदसिध्द पदनामे (Ex-officio Designations) पंचायती नगरपालिका यांच्या निवडणुकांच्या संदर्भात अमलात येतील. त्यामुळे संबंधि अधिका-यांच्या सध्याच्या पदनामामध्ये अथवा पचायती व नगरपालिका निवडणुकां

कामामध्ये कोणताही बदल होणार नसून केवळ पंचायती व नगरपालिकांच्या निवडणुकांपुरती सदर पदनामे वापरली जाणार आहेत.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(अ. स. डोंगरे)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)
महानगरपालिका आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
उप विभागीय आयुक्त (विकास) (सर्व)
उप विभागीय आयुक्त (सामान्य) (सर्व)

पंचायत व नगरपालिका निवडणुकांच्या कामकाजाच्या संदर्भात अधिकाऱ्यांसाठी पदसिद्ध पदनामे

| अ.क्र | अधिकारी | जिल्हा परिषदा/ पंचायत समिती निवडणुका | ग्रामपंचायत निवडणुका | महानगरपालिका निवडणुका | नगर परिषदा निवडणुका | कामे/जबाबदाऱ्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | विभागीय आयुक्त | विभागीय निवडणूक अधिकारी | विभागीय निवडणूक अधिकारी | विभागीय निवडणूक अधिकारी (जेथे महानगरपालिका आयुक्त विभागीय आयुक्तांच्या वरिष्ठ श्रेणीतील असतील अशा महानगरपालिका वगळून) | विभागीय निवडणूक अधिकारी | विभागीय पातळीवर पंचायत व नगरपालिका निवडणुकांच्या एकूण समन्वयाची जबाबदारी | एकूण समन्वयाची भूमिका |
| २ | उप विभागीय आयुक्त (विकास) | उप विभागीय निवडणूक अधिकारी | उप विभागीय निवडणूक अधिकारी | --- | --- | विभागीय पातळीवर पंचायत निवडणुकांच्या समन्वयाची जबाबदारी | समन्वयाची भूमिका |
| ३ | उप विभागीय [illegible] | --- | --- | --- | उप विभागीय निवडणूक अधिकारी | विभागीय पातळीवर नगरपरिषदा/नगर पंचायती यांच्या निवडणुकांच्या [illegible] | समन्वयाची भूमिका [illegible] |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | महानगरपालिका | | | महानगरपालिका | | समन्वयाची जबाबदारी महानगरपालिका | सध्याचे |
| ५ | जिल्हाधिकारी | जिल्हा निवडणूक अधिकारी | जिल्हा निवडणूक अधिकारी | | जिल्हा निवडणूक अधिकारी | जिल्हा परिषदा/पंचायत समित्या/ग्रामपंचायती/ नगर परिषदा/नगर पंचायती यांच्या निवडणुकांचे कामकाज सध्याच्या व्यवस्थेनुसार | सध्याचे कामात बदल नाही |
| ६ | जिल्हाधिकारी अथवा महानगरपालिका आयुक्त नियुक्त करतील असे अधिकारी | मतदार यादी तयार करण्याकरिता प्राधिकृत अधिकारी | मतदार यादी तयार करण्याकरिता प्राधिकृत अधिकारी | मतदार यादी तयार करण्याकरिता प्राधिकृत अधिकारी | मतदार यादी तयार करण्याकरिता प्राधिकृत अधिकारी | सध्याच्या व्यवस्थेनुसार मतदार यादी तयार करणेसाठी जबाबदार | सध्याचे कामात बदल नाही |

टीप - (१) सध्याच्या व्यवस्थेमध्ये कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत.

(२) विभागीय पातळीवर आता विभागीय आयुक्त एकूण समन्वयाची जबाबदारी पार पाडतील.

## EX-OFFICIO DESIGNATIONS FOR PANCHAYAT AND MUNICIPALITY ELECTIONS

| SR. NO. [1] | OFFICER [2] | ZILLA PARISHAD / PANCHAYAT SAMITIS [3] | VILLAGE PANCHAYATS [4] | MUNICIPAL CORPORATIONS [5] | MUNICIPAL COUNCILS [6] | FUNCTIONS [7] | REMARKS [8] |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | DIVISIONAL COMMISSIONER | DIVISIONAL ELECTION OFFICER | DIVISIONAL ELECTION OFFICER | DIVISIONAL ELECTION OFFICER (Excluding where Municipal Commissioner is Senior to Divisional Commissioner) | DIVISIONAL ELECTION OFFICER | OVERALL CO-ORDINATING RESPONSIBILITY FOR PANCHAYAT & MUNICIPAL ELECTIONS AT A DIVISIONAL LEVEL | OVERALL CO-ORDINATING ROLE |
| 2 | DEPUTY COMMISSIONER (DEVELOPMENT) | DEPUTY DIVISIONAL ELECTION OFFICER | DEPUTY DIVISIONAL ELECTION OFFICER | | | RESPONSIBLE FOR CO-ORDINATION OF PANCHAYAT ELECTIONS AT A DIVISIONAL LEVEL | CO-ORDINATING ROLE |
| 3 | DEPUTY COMMISSIONER (GENERAL) | – | – | – | DEPUTY DIVISIONAL ELECTION OFFICER | RESPONSIBLE FOR CO-ORDINATION OF MUNICIPAL COUNCIL ELECTIONS AT A DIVISIONAL LEVEL | CO-ORDINATING ROLE |
| 4 | MUNICIPAL COMMISSIONER | – | – | MUNICIPAL CORPORATION ELECTION OFFICER | – | RESPONSIBLE FOR MUNICIPAL CORPORATION ELECTIONS AS PER PRESENT ARRANGEMENT | AS AT PRESENT |
| 5 | COLLECTOR | DISTRICT ELECTION OFFICER | DISTRICT ELECTION OFFICER | – | DISTRICT ELECTION OFFICER | RESPONSIBLE FOR PANCHAYAT & MUNICIPAL COUNCIL ELECTIONS IN THE DISTRICT AS PER PRESENT ARRANGEMENT | AS AT PRESENT |
| 6 | DESIGNATED BY COLLECTOR/ MUNICIPAL COMMISSIONER | DESIGNATED OFFICER FOR VOTERS LISTS PREPARATION | DESIGNATED OFFICER FOR VOTERS LISTS PREPARATION | DESIGNATED OFFICER FOR VOTERS LISTS PREPARATION | DESIGNATED OFFICER FOR VOTERS LISTS PREPARATION | RESPONSIBLE FOR PREPARATION & UPDATING THE VOTERS LIST AS PER PRESENT ARRANGEMENT | AS AT PRESENT |

NOTE : 1) There are no changes in the present arrangement.

2) Only Divisional Commissioners will now be exercising an overall co-ordinating role in their Divisions.